वाचले –

१) मा.आयुक्तसो यांचेकडील दिनांक - ११ /०५/२०२३ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/ ५ /कावि/२७७ /२०२३
दि. २९ /०५/२०२३

विषय – माध्यमिक विदयालय कासारवाडी येथे उर्दु माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग सुरु करणेबाबत....

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कासारवाडी या ठिकाणी उर्दू माध्यमातील इयत्ता १ ली ते ८ वी ची महानगरपालिकेची प्राथमिक उर्दू शाळा सुरु आहे. तथापी याच शाळेतील विदयार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी कासारवाडी येथेच पुढील शिक्षण घेणेसाठी इयत्ता ९ वी व १० वी चे उर्दू माध्यमाचे वर्ग सुरु करणेबाबत नागरिकांची मागणी असल्याने उर्दु माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग सुरु करणे आवश्यक आहे.

माध्यमिक विदयालय कासारवाडी या विदयालयात वर्ग उपलब्ध नसल्याने डॉ. अल्लामा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी यांचेकडुन वर्गखोल्या बाबत व इतर भौतिक सोई सुविधा उपलब्ध आहे किंवा कसे? याबाबत अहवाल माध्य/शि/०५/कावि/१६३/२०२३ दिनांक – २७/०४/२०२३ अन्वये मागविणेत आलेला होता. त्यानुसार मुख्याध्यापक, डॉ अल्लमा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी यांनी पत्र क्र. जा.न. ८३/२०२३ दि.२७/०४/२०२३ रोजीचे पत्रान्वये वर्ग खोल्या व इतर भौतिक सोई सुविधा उपलबध असलेबाबत अहवाल प्राप्त झालेला आहे.

मा.आयुक्तसो यांनी दि. ११/०५/२०२३ च्या मान्य प्रस्तावान्वये कासारवाडी येथे उर्दू माध्यमाचे इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार माध्यमिक विदयालय कासारवाडी या विदयालयाचे मुख्याध्यापक यांनी डॉ. अल्लमा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी येथे इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गावर नियंत्रण ठेवण्यात यावे. तसेच उर्दु विदयालयातील वर्गाना शासकीय मान्यता मिळेपर्यंत विदयार्थ्यांचे दाखले तसेच शैक्षणिक कामकाजाबाबत रेकॉर्ड उर्दु माध्यमिक विदयालय आकुर्डी येथे ठेवणेत यावे.

सबब मी. सहाय्यक आयुक्त, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाचले क्र. १ च्या मा. आयुक्त सो यांचेकडील मान्य प्रस्तावास अधिन राहुन माध्यमिक विदयालय कासारवाडी यांच्या नियंत्रणात डॉ. अल्लमा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी येथे उर्दु माध्यमाचे इयत्ता ९ वी चे वर्ग शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ पासुन व इयत्ता १० वी चे वर्ग शैक्षणिक वर्ष २०२४ – २०२५ पासुन सुरु करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

( विजयकुमार थोरात )
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति,

१) मुख्याध्यापक, माध्यमिक विदयालय कासारवाडी

२/- उर्दु माध्यमाच्या वर्गावर संपूर्ण नियंत्रण ठेवून कामकाज करुन घेणेत यावे. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीपासुन शाळा सुरु करणेबंधी नियोजन करणेत यावे. त्या संबंधात कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची स्पष्ट नोंद घेणेत यावी. डॉ. अल्लमा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी विदयालयांच्या वर्गाचे सर्व रेकॉर्ड माध्यमिक विदयालय आकुर्डी उर्दू येथे ठेवणेत यावे. त्या प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

२) मुख्याध्यापक , माध्यमिक विदयालय आकुर्डी

२/- डॉ अल्लमा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी येथे उर्दु माध्यमिक विदयालयाचे इ. ९ वी चा वर्ग चालु वर्षी सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षापासुन व पुढील वर्षी सन २०२४ – २०२५ पासुन इयत्ता १० वी चा वर्ग सुरु करण्यात येत असुन सदर वर्गांना स्वतंत्र शाळेची शासकीय मान्यता मिळेपर्यंत सर्व विदयालयाचे रेकॉर्ड माध्यमिक विदयालय आकुर्डी उर्दु विदयालयात ठेवणेत येत आहे.

प्रत –

१) प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग

२) मुख्याध्यापक, डॉ अल्लमा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी

२/- संबधीत मुख्याध्यापक, डॉ.अल्लमा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी येथे उर्दु माध्यमिक विदयालयाचे चालु वर्षी सन २०२३-२०२४ पासुन इ. ९ वी चा वर्ग चालु करणेकामी आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा व प्रत्येक वर्षी विदयार्थ्यांचे दाखले माध्यमिक विदयालय कासारवाडी यांना उपलब्ध करुन देण्यात यावे.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८